महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनीक्र.०२२-६८५९७४१०/४६५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२०/दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका/ ८३२ दिनांक : २०/१०/२०२०

## प्रवेशासाठीचे वेळापत्रक: अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक वाढविणेबाबत
## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता तीन वर्ष कालावधीच्या, पुर्ण वेळ पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे आणि अर्ज निश्चित करणे या प्रक्रियेंच्या अंतिम दिनांकास मुदत वाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य / अखिलभारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि सुधारित तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु. | प्रक्रिया | वेळापत्रक | |
|---|---|---|---|
| | | पहिली तारीख | सुधारित अंतिम तारीख |
| १. | प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांद्वारे संकेतस्थळावरुन अर्ज छाननीची योग्य पद्धत (ई-स्क्रूटनी /प्रत्यक्ष स्क्रूटनी) निवड करुन ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे. (महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय/ जम्मू-कश्मीरवलडाखविस्थापित उमेदवारांसाठी) | १०-०८-२०२० | २७*-१०-२०२० |
| २. | प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चिती करणे (ई-स्क्रूटनी /प्रत्यक्ष स्क्रूटनी) | ११-०८-२०२० | २७*-१०-२०२० |
| * प्रवेश प्रक्रियेच्या कॅपव्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कटऑफ डेटपर्यंत) सुरू ठेवल्या जातील. दि. २७ ऑक्टोबर २०२० नंतर ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पद्धतीद्वारे नोंद होणारे, पडताळणी व निश्चित होणारे अर्ज संस्था स्तरावरील व कॅपव्यतिरिक्त जागांसाठीच विचारात घेतले जातील. | | | |
| ३. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे. | ३०-१०-२०२० | |
| ४. | सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी: तात्पुरत्या गुणवत्ता याद्यामध्ये तक्रार,असल्यास त्या सादर करणे | ३१-१०-२०२० | ०२-११-२०२० |
| ५. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / जम्मू-कश्मीर व लडाख विस्थापित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे. | ०४-११-२०२० | |

टिप:

- ऑनलाईन अर्ज भरणे व निश्चित करणे याकरिता उमेदवारांच्या सोयीनुसार "ई-स्क्रूटनी" व "प्रत्यक्ष स्क्रूटनी" छाननी पद्धतीची माहिती, प्रवेशासाठीचे पात्रतेचे निकष, अर्ज भरण्यासाठीचे शुल्क, उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना इत्यादी सर्व बाबी संचालनालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२०/दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका/४९४, दिनांक : ०७/०८/२०२० च्या प्रवेशासाठीच्या परिपत्रकानुसार राहतील.
- कॅपच्या विविध फेरीकरिता विकल्प अर्ज (ऑपशन फॉर्म) भरणे, कॅप जागा वाटप, जागा स्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर घोषित केले जाईल आणि ते **http://poly20.dtemaharashtra.org** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- मदतकक्ष क्रमांक ८६९८७४३२५६/८६९८७५८२३७ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई